आपली सेवा आमचे कर्तव्य

# राज्य लोकसेवा हक्क आयोग

**राज्य मुख्य लोकसेवा हक्क आयुक्त कार्यालय,**
**नवीन प्रशासन भवन, ७ वा मजला, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२**

**ई-मेल :-ccrts@maharashtra.gov.in** **दुरध्वनी :-०२२-२२८३२३४६**

क्र: -विआका-२०२१/प्र.क्र.७१ /मुसेहआ दिनांक :- ०१ डिसेंबर, २०२१

वाचा – १. या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्र.अपील२०१७/प्र.क्र.१५/मुसेहआ, दि.२७.०६.२०१७.
२. सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र. आरटीएस-२०२१/प्र.क्र.१५८/लो.दि.कक्ष दि.२३.११.२०२१.

## कार्यालयीन आदेश

अद्यापपर्यंत, प्रत्येक महसुली विभागाकरीता राज्य लोकसेवा हक्क आयुक्त यांची नियुक्ती करण्यात आली नव्हती. या महसुली विभागामधुन प्राप्त होणाऱ्या अपिलांच्या कालमर्यादेचे उल्लंघन होऊ नये तसेच, जनतेस वेळीच न्याय मिळून त्वरीत सेवा प्राप्त व्हाव्यात याकरीता, इतर ६ आयुक्तांची नियुक्ती होईपर्यंतच्या कालावधीकरीता, मुख्य आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग यांनी, त्यांचे कार्यक्षेत्र- मुंबई शहर जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्हा यासह सर्व महसुली विभागातून प्राप्त होणाऱ्या अपिलांवर सुनावणी घ्यावी, असे संदर्भाधीन क्र.१ येथील आदेशान्वये घोषित करण्यात आले होते.

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्र.३ येथील दि.२३.११.२०२१ रोजीच्या अधिसूचने अन्वये नाशिक/ पुणे/ नागपूर/ अमरावती/ औरंगाबाद या महसुली विभागातील आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग यांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच, त्यांनी दि.०१.१२.२०२१ रोजी पदभार स्विकारला आहे. सबब, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम कलम १३ (२)(ख) नुसार, आयुक्त, राज्य लोकसेवा हक्क आयोग, नाशिक/ पुणे/ नागपूर/ अमरावती/ औरंगाबाद महसुली विभाग, यांच्याकडे त्या-त्या महसुली विभागातुन प्राप्त होणाऱ्या ऑनलाईन/ ऑफलाईन अपिले, अर्ज/तक्रार/ निवेदनांबाबतचे कामकाज वर्ग करण्यात येत आहे.

तथापि, आयुक्त, राज्य लोकसेवा हक्क आयोग, कोकण महसुली विभाग हे पद रिक्त आहे. त्यामुळे, कोकण महसुली विभागाकरीता आयुक्तांची नेमणूक होईपर्यंतच्या कालावधीसाठी, कोकण महसुली विभागामधुन प्राप्त होणाऱ्या ऑनलाईन/ ऑफलाईन अपिले, अर्ज/ तक्रार/ निवेदनांबाबतचे कामकाज मुख्य आयुक्त, राज्य लोकसेवा हक्क आयोग यांच्याकडे वर्ग राहील.

(स्वाधीन क्षत्रिय)
मुख्य आयुक्त
राज्य लोकसेवा हक्क आयोग

प्रति :-

१. सौ. चित्रा विकास कुलकर्णी, आयुक्त, राज्य लोकसेवा हक्क आयोग, नाशिक महसुली विभाग
२. श्री. दिलीप मोहनराव शिंदे, आयुक्त, राज्य लोकसेवा हक्क आयोग, पुणे महसुली विभाग